दैनिक जनप्रवास

# अभिराज पवारची प्रीमियर लीग कबड्डी संघात निवड

**जनप्रवास । इस्लामपूर**

येथील म. फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या अभिराज मनोज पवार याची कबड्डी प्रीमियर लीग मधील तेलगू थलायवाज या कबड्डी संघात निवड झाली आहे. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



अभिराज पवार

अभिराज मनोज पवार हा कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचा विद्यार्थी असून त्याने कॉलेजच्यावतीने राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय अनेकविध पुरुष कबड्डी स्पर्धेत नैपुण्य गाजवले आहे. त्याची कबड्डी प्रीमियर लीगमधील तेलगू थलायवाज कबड्डी संघात निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव सरोज पाटील, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील यांनी कौतुक केले आहे. त्याला डॉ. अमित माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. कमलेश ठाकरे, अजित पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

पुण्य नगरी



**इस्लामपूर : विजयी संघातील विद्यार्थी–खेळाडूंसोबत कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे.**

# के.बी.पी. कॉलेजला कबड्डीत अजिंक्यपद

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** बळवंत कॉलेज, विटा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय पुरुष कबड्डी स्पर्धेत इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज संघाने अजिंक्यपद मिळवले. स्पर्धेची अंतिम लढत केबीपी कॉलेज विरुद्ध केडब्ल्यूसी कॉलेज या दोन संघात  झाली. यात केबीपी कॉलेजने १४ गुणांनी विजय मिळवला. या स्पर्धेतून केबीपी कॉलेजच्या संघाची निवड शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी झाली. या विजयी संघातील सर्व खेळाडूंचे त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

Sangli Edition
Sep 22, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# तरुण भारत



इस्लामपूर : खेळाडूंसोबत कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, डॉ. संदीप पाटील, प्रा. डॉ. ए. यू. माने, डॉ. प्रमोद गंगणमाले.

## 'केबीपी'च्या कबड्डी संघाची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड

**इस्लामपूर :** विटा येथील बळवंत कॉलेज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय पुरुष कबड्डी स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज संघाने अजिंक्यपद मिळवले. स्पर्धेची अंतिम लढत केबीपी कॉलेज विरुद्ध केडब्ल्यूसी कॉलेज संघात झाली. यात केबीपी कॉलेजने १४ गुणांनी विजय मिळवला. या संघाची निवड शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेसाठी झाली. संघातील रणवीर पाटील, श्रवण कुंभार, बसुराज गुजले, शुभम मोकाशी, ओंकार जंगम, अरमान नायकवडी, गौरव कोळी, हर्षवर्धन अपुगडे, यश कदम, अनिकेत माने, दीपक जगदाळे, आदेश सूर्यवंशी या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष ॲड.एन.आर.पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, संगीता पाटील, प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ.पी.व्ही.गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील यांनी अभिनंदन केले. प्रा.डॉ. अमितराज माने, प्रा.के. आर.ठाकर, महेश पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

# कर्मवीर महाविद्यालयाची मल्लखांबपटू वैष्णवी देवकरचा इस्लामपुरात सत्कार



इस्लामपूर : मल्लखांबपटू वैष्णवी देवकर हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील आदी.

इस्लामपूर, ता. ३० : सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा येथे आयोजित शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय महिला मल्लखांब स्पर्धेत येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या वैष्णवी देवकर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. तिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. वैष्णवी या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव सरोजमाई पाटील, महाविद्यालयीन विकास समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील यांनी तिचे अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. कमलेश ठाकरे, महेश पाटील, विजय कांबळे यांनी तिला मार्गदर्शन केले.

पुण्य नगरी



इस्लामपूर : शिवकरण पाटील याचा सत्कार करताना संगीता पाटील, समवेत प्राचार्य डॉ. नितीन शिंदे व मान्यवर.

# केबीपीच्या शिवकरण पाटीलला आंतरविभागीय स्पर्धेत सुवर्णपदक

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय जुदो स्पर्धेत के. बी. पी. कॉलेजच्या शिवकरण आनंदराव पाटील याने १०० किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून व सुवर्णपदक पटकावले. त्याची निवड शिवाजी विद्यापीठ जुदो संघात झाली असून तो आता अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा दि. ११ ते १४ नोव्हेंबर रोजी भोपाळ युनिव्हर्सिटी भोपाळ या ठिकाणी होतील. त्याच्या या यशाबद्दल ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, संगीता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील, कॉलेजमधील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी त्याचे अभिनंदन केले. डॉ. अमितराज माने व प्रा. के. आर. ठाकरे यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. अजित पाटील यांचे त्याला सहकार्य मिळाले.

Sangli Edition
Oct 20, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

सकाळ TODAY



इस्लामपूर : आंतरविभागीय ज्युदो स्पर्धेतील यशाबद्दल शिवकरण पाटील याचा सत्कार करताना संगीता पाटील, प्राचार्य डॉ. शिंदे, डॉ. एस. के. माने, डॉ. अमितराज माने, दीपक कोठावळे आदी.

# ज्युदो स्पर्धेत शिवकरण पाटीलचे यश

**इस्लामपूर :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील शिवकरण आनंदराव पाटील याने कोल्हापुरातील छत्रपती शहाजी महाविद्यालयात आयोजित शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय ज्युदो स्पर्धेत १०० किलो वजन गटात प्रथमासह सुवर्णपदक पटकावले. त्याची शिवाजी विद्यापीठ ज्युदो संघात निवड झाली असून तो आता अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा ११ ते १४ नोव्हेंबरदरम्यान भोपाळ विद्यापीठात होईल. महात्मा फुले शिक्षण संस्था अध्यक्ष अॅड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी सरोजमाई पाटील, कॉलेजच्या विकास समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील यांनी त्याचे अभिनंदन केले. त्याला जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने व प्रा. के. आर. ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. अजित पाटील यांचे त्याला सहकार्य मिळाले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
www.pudhari.news

## इस्लामपूरसह वाळवा तालुका

**इस्लामपूर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त इस्लामपूर शहर आणि संपूर्ण वाळवा तालुक्यात उत्साहात योग दिन साजरा करण्यात आला. राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, यशवंतराव चव्हाण कला आणि विज्ञान महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, योग विद्याधामच्या इस्लामपूर शाखेने शहरातील मुख्य मैदानावर भव्य योग शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात शेकडो योगप्रेमींनी सहभाग घेतला. ग्रामीण भागातही योग दिनाचा उत्साह दिसून आला.

My Sangli Edition
Jun 22, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी



इस्लामपूर : 'भक्तियोग' मध्ये सहभागी झालेले कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी वृंद.

# केबीपीमध्ये भक्तियोग उत्साहात साजरा

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने शासनाने आयोजित केलेला भक्तियोग उत्साहात साजरा करण्यात आला.

यामध्ये एकूण २०० च्या आसपास प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी झाले होते. पल्लवी वड्डी, तनुजा पाटील, अथर्व सावंत, प्रज्वल बिचकर, सुजल बिचकर आदी ज्युनिअर व सिनिअरच्या विद्यार्थ्यांसोबत जिमखाना विभागप्रमुख डॉ. अमितराज माने, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील, प्रा. एम. टी. खंडेलोटे, संस्थेच्या सदस्य प्रा. स्मिता पाटील, डॉ. अनिल पाटील व मान्यवर उपस्थित होते.

Sangli Edition
Jun 22, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# कभापा कॉलेजात भक्तीयोग उत्साहात



कभापा कॉलेजात भक्ती-योगा इव्हेंटमध्ये सहभागी शिक्षक व विद्यार्थी.

**जनप्रवास । इस्लामपूर**

म. फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्ताने आयोजित केलेला भक्ती-योग इव्हेंट मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने या इव्हेंटमध्ये सहभाग दिला.

योग व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल या संयोगातून वारकरी संगीताच्या तालावर योग या समन्वयाचा जिल्हा परिषद सांगली, विश्व योग दर्शन केंद्र मिरज, सांगली आणि चितळे डेअरी, भिलवडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले होते. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, महात्मा फुले विद्यालय यांनी एकत्र येऊन भक्ती-योग इव्हेंट उत्साहात साजरा केला. २०० च्या आसपास प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. सर्वांनी पारंपरिक पांढऱ्या पोशाखात वारकरी संगीताच्या तालावर योगासने केली. शासनकृत इव्हेंटच्या ऑनलाईन वेबसाईटशी लाईव्ह सहभाग नोंदवला. पल्लवी वड्डी, तनुजा पाटील, अथर्व सावंत, प्रज्वल बिचकर, सुजल बिचकर, जिमखाना विभागप्रमुख डॉ. अमितराज माने, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही गायकवाड, डॉ. संदीप पाटील, ज्युनियरचे उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, पर्यवेक्षक प्रा. एम. टी. खंडेलोटे, संस्थेच्या सदस्य प्रा. स्मिता पाटील, डॉ. अनिल पाटील उपस्थित होते.



इस्लामपूर : कर्मवीर महाविद्यालयात भक्तियोगमध्ये सहभागी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील आदी.

# इस्लामपुरात भक्तियोग मोठ्या उत्साहात

इस्लामपूर, ता. २१ : येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने शासनाने आयोजित केलेला भक्तियोग मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज आणि महात्मा फुले विद्यालय इस्लामपूर यांनी एकत्र येऊन भक्तियोग सादर केला. सर्वांनी पारंपरिक पांढऱ्या पोशाखात वारकरी संगीताच्या तालावर योगासने केली. या शासनकृत इव्हेंटच्या ऑनलाईन वेबसाईटद्वारे लाईव्ह सहभाग नोंदवला. पल्लवी वड्डी, तनुजा पाटील, अथर्व सावंत, प्रज्वल बिचकर, सुजल बिचकर या विद्यार्थ्यांसमवेत जिमखाना विभागप्रमुख डॉ. अमितराज माने व उपप्राचार्य डॉ संदीप पाटील यांनी संयोजन केले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील, उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, पर्यवेक्षक प्रा. एम. टी. खंडेलोटे, प्रा. स्मिता पाटील, डॉ. अनिल पाटील उपस्थित होते.

# भक्तीयोग इव्हेंटमध्ये दोनशेंचा सहभाग

## कर्मवीरमध्ये वारकरी संगीताच्या तालावर योग

प्रतिनिधी
इस्लामपूर !

म.फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्ताने भक्ती–योग इव्हेंट मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शासनातर्फे भक्ती–योग इव्हेंट साजरा करण्याचे आवाहन शाळा–कॉलेज यांना केले होते. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने या इव्हेंट मध्ये सहभाग घेतला.

योग व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल या संयोगातून "वारकरी संगीताच्या तालावर योग" या समन्वयाचा हा इव्हेंट जिल्हा परिषद सांगली, विश्व योग दर्शन केंद्र मिरज, सांगली आणि चितळे डेअरी, भिलवडी यांच्या संयुक्त विद्यमाने सदर इव्हेंटचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार दि.२१ जून



**इस्लामपूर : भक्ती–योग इव्हेंटमध्ये सहभागी झालेले डॉ. नितीन शिंदे, डॉ. पी. व्ही गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील, प्रा. एम. टी. खंडेलोटे, प्रा. स्मिता पाटील, डॉ. अनिल पाटील, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी.**

रोजी सकाळी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज आणि महात्मा फुले विद्यालय इस्लामपूर यांनी एकत्र येऊन भक्ती–योग इव्हेंट साजरा केला. एकूण २०० च्या आसपास प्राध्यापक व विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले. सर्वांनी पारंपारिक पांढऱ्या पोशाखात वारकरी संगीताच्या तालावर योगासने केली.

पल्लवी वड्डी, तनुजा पाटील, अथर्व सावंत, प्रज्वल बिचकर, सुजल बिचकर विद्यार्थ्यांसोबत जिमखाना विभागप्रमुख डॉ.अमितराज माने व उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील यांनी संयोजन केले. प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, डॉ.पी.व्ही गायकवाड, डॉ.संदीप पाटील, प्रा.संतोष पाटील, प्रा.एम.टी. खंडेलोटे, सदस्या प्रा.स्मिता पाटील व डॉ.अनिल पाटील उपस्थित होते.

सकाळ TODAY

# कर्मवीर महाविद्यालयाची मल्लखांबपटू वैष्णवी देवकरचा इस्लामपुरात सत्कार

इस्लामपूर, ता. ३० : सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा येथे आयोजित शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय महिला मल्लखांब स्पर्धेत येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या वैष्णवी देवकर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. तिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. वैष्णवी या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव सरोजमाई पाटील, महाविद्यालयीन विकास समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील यांनी तिचे अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. कमलेश ठाकरे, महेश पाटील, विजय कांबळे यांनी तिला मार्गदर्शन केले.



इस्लामपूर : मल्लखांबपटू वैष्णवी देवकर हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील आदी.

तरुण भारत संवाद



इस्लामपूर : मल्लखांबपटू वैष्णवी देवकर हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, समवेत डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे.

# केबीपीच्या वैष्णवीचे मल्लखांब स्पर्धेत यश

**इस्लामपूर :** सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा या ठिकाणी झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय महिला मल्लखांब स्पर्धेत म.फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या, वैष्णवी देवकर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. तिची निवड अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. ती या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. या तिच्या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.एन.आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव सरोज पाटील, महाविद्यालयीन विकास समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ.पी व्ही गायकवाड, डॉ.संदीप पाटील तसेच सर्व प्राध्यापक प्रशासकीय सेवक यांनी तिचे अभिनंदन केले आहे. जिमखाना विभागाचे डॉ.अमितराज उत्तमराव माने, डॉ.संदीप पाटील, प्रा.कमलेश ठाकरे, महेश पाटील, विजय कांबळे यांचे तिला मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# केबीपीच्या वैष्णवी देवकरची आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी निवड



■ मल्लखांबपटू वैष्णवी देवकर हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, समवेत उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील, प्रा. होनमोरे, डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे.

जनप्रवास । इस्लामपूर

येथील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय महिला मल्लखांब स्पर्धेत महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या वैष्णवी देवकर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. तिची निवड अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी झाली आहे. ती या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. तिच्या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव सरोज पाटील, महाविद्यालयीन विकास समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील, संस्थेचे सर्व सदस्य कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, सर्व प्राध्यापक प्रशासकीय सेवक यांनी तिचे अभिनंदन केले आहे. जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. कमलेश ठाकरे, महेश पाटील, विजय कांबळे यांचे तिला मार्गदर्शन लाभले.

सकाळ TODAY

# बुद्धिबळ स्पर्धेतील यशाबद्दल अर्पिता कारंडे हिचा सत्कार

इस्लामपूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठांतर्गत सांगली विभागीय महिला बुद्धिबळ स्पर्धेत येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या अर्पिता कारंडे हिने तृतीय क्रमांक मिळवला. तिची सायबर कॉलेज कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली.

स्पर्धेत कॉलेज, त्याचबरोबर सांगली विभागाचे ती प्रतिनिधित्व करणार आहे. तिच्या या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी सरोजमाई पाटील, कॉलेजच्या विकास समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील, प्राध्यापक, प्रशासकीय सेवकांनी तिचे अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे, अजित पाटील यांनी तिला मार्गदर्शन केले.



इस्लामपूर : बुद्धिबळ स्पर्धेतील यशाबद्दल अर्पिता कारंडे हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील. समवेत डॉ. राजेश दांडगे, डॉ. शीला लाड, प्रा. अभयकुमार पाटील, प्रा. अमितराज माने व प्रा. के. आर. ठाकरे.

बातम्यांचा राजा
जनप्रवास



अर्पिता कारंडे हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, डॉ. राजेश दांडगे, डॉ. शीला लाड, प्रा. अभयकुमार पाटील, प्रा. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे आदी.

# आंतरविभागीय बुध्दिबळ स्पर्धेसाठी अर्पिता कारंडेची निवड

जनप्रवास । इस्लामपूर

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय महिला बुध्दिबळ स्पर्धेत महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या अर्पिता कारंडे हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे. तिची निवड सायबर कॉलेज कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय बुध्दिबळ स्पर्धेसाठी झाली आहे. या स्पर्धेत कॉलेजचे त्याचबरोबर सांगली विभागाचे ती प्रतिनिधित्व करणार आहे. तिच्या या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष मा. सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, कॉलेजच्या विकास समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, सदस्य त्याचबरोबर कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, कॉलेजमधील सर्व प्राध्यापक प्रशासकीय सेवकांनी तिचे अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज उत्तमराव